मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
। पश्चिम महाराष्ट्र ।
www.rajdand.com
follow us : /rajdandlive
सातारा दि. २५ मे २०२४
RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २५८ * सातारा * सातारा शुक्रवार दि. ३१ मे २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

## लोकसभा निवडणुकीनंतर बारामती शहर, तालुक्याच्या राजकारणात मोठे बदल होण्याचे संकेत



**बारामती :** पवार कुटुंबीय आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीनंतर बारामतीच्या राजकारणाचे चित्र बदलून गेले आहे. विशेषत: लोकसभा निवडणुकीनंतर शहर आणि तालुक्याच्या राजकारणात मोठे बदल होण्याचे संकेत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार लोकसभा निवडणूक संपल्यानंतर अवघ्या ८ दिवसातच पुन्हा कार्यरत झाले. युगेंद्र यांनी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात प्रत्येक आठवड्यात येण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीत युगेंद्र पवार यांनी चुलते अजित पवार यांच्या विरोधात जात खासदार सुप्रिया सुळे यांचा सक्रिय सहभाग घेत प्रचार केला. सध्या युगेंद्र पवार हे निवडणुका संपल्यावर नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्यावर भर देत आहे. जिरायती भागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी त्यांनी काही ठिकाणी शरयु फाउंडेशनच्या वतीने पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू केले आहेत. दर मंगळवारी ते पक्ष कार्यालयात उपस्थित राहत आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युगेंद्र पवार यांचा प्रभावी जनसंपर्क वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मानले जाते. राजकारणाबाबत वेळ आल्यावर पाहू, सध्या लोकांचे प्रश्न सोडविण्यावर आपला भर असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे चिरंजीव जय पवार हे देखील बारामतीच्या राजकारणात गेल्या आठवड्यापासून 'क्विव्ह' झाले आहेत. पक्ष कार्यालयात जय पवार हे नागरिकांना भेटत आहेत. बुधवारी (दि. २९) त्यांनी बारामतीत नागरिक व कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी; अडचणी समजून घेत तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. तसेच येथील राष्ट्रवादी भवनात नागरिक व कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. नागरिक आणि कार्यकर्त्यांनी सांगितलेल्या अडचणी आणि कामांबाबत जय पवार यांनी चर्चा केली.

आगामी काळात 'पवार विरुद्ध पवार' राजकारण रंगणार?

सलग दोन आठवड्यांपासून जय पवार हे बारामतीत येत आहेत. लोकसभा निवडणुकीत देखील संपूर्ण पवार कुटुंब विरोधात प्रचार करीत असताना जय पवार यांनी आई सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराची धुरा सांभाळली. आता निवडणूक संपल्यावर जय पवार पुन्हा क्विव्ह झाले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील लोकसभा निवडणुकीत थांबलेला जनता दरबार पुन्हा सुरू केला आहे. उपमुख्यमंत्री पवार यांच्यावर राज्याची जबाबदारी असल्याने बारामतीच्या राजकारणात त्यांचे धाकटे चिरंजीव अधिक लक्ष घालणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे बारामतीत आता आगामी काळात 'पवार विरुद्ध पवार' राजकारण रंगताना पहावयास मिळेल.

# विधानपरिषदेच्या जागेवरून निर्माण झालेला तिढा सुटणार?

## आशिष शेलारांनी घेतली राज ठाकरेंची भेट

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीनंतर आता राज्यात विधानपरिषद निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने मनसे आणि भाजपमध्ये संघर्ष रंगत असल्याचं दिसत आहे. कारण कोकण पदवीधर मतदार संघातून मनसेनं अभिजीत पानसे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपचे निरंजन डावखरे हे गेली दोन टर्मचे कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार आहेत. असं असताना मनसेकडून पानसे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आल्याने महायुतीत मिठाचा खडा पडला आहे. या पार्श्वभूमीवर तोडगा काढण्यासाठी भाजप नेते आणि आमदार आशिष शेलार यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी जाऊन भेट घेतली आहे.



विधानपरिषद निवडणुकीत मनसेसोबत संघर्ष झाल्यास याचे पडसाद आगामी विधानसभा निवडणुकीतही उमटण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा संघर्ष टाळण्यासाठी भाजपकडून प्रयत्न केले जात असल्याचं दिसून येत असून या प्रयत्नांचा एक भाग म्हणूनच आशिष शेलार यांनी राज ठाकरेंची भेट घेतल्याची माहिती आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत कोकण पदवीधर मतदार संघावरून सुरू असलेला मनसे-भाजपमध्ये वाद मिटणार का, हे पाहावं लागेल.

विधान परिषदेच्या मुंबई व कोकण पदवीधर तसेच मुंबई आणि नाशिक शिक्षक या चार मतदार संघांसाठी पुढे ढकललेला निवडणुकीचा सुधारित कार्यक्रम शुक्रवारी निवडणूक आयोगाने जाहीर केला. त्यानुसार चार जागांसाठी येत्या २६ जून रोजी मतदान होणार असून, मतमोजणी १ जुलै रोजी होणार आहे. विधानपरिषदेत मुंबई पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे उद्धवसेनेचे विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपचे निरंजन डावखरे, मुंबई शिक्षकचे कपिल पाटील व नाशिक शिक्षकचे किशोर दराडे यांची सदस्यत्वाची मुदत ७ जुलै २०२४ रोजी संपत आहे. त्यामुळे या चार जागांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे

दरम्यान, लोकसभेला एकत्र आलेले पक्ष विधान परिषदेच्या निवडणुकीत एकमेकांविरोधात उमेदवार उभे करू लागले आहेत. काँग्रेसला जागा हवी असताना उद्धव ठाकरेंनी उमेदवार जाहीर केला आहे. तर भाजपाच्या जागेवर काही दिवसांपूर्वीच मोदींना पंतप्रधान पदासाठी पाठिंबा देणाऱ्या व त्यांच्यासोबत सभा घेणाऱ्या राज ठाकरेंनी उमेदवार जाहीर केला आहे. आता भाजप निरंजन डावखरेंना मनसे विरोधात लढविणार का, हे पाहावं लागेल.

## धंगेकरांसह सुषमा अंधारेही अडचणीत येणार?

### मंत्री शंभूराज देसाईंनी दिला आक्रमक इशारा



**मुंबई :** पुण्यातील कल्याणीनगर इथं झालेल्या अपघातानंतर आरोपीला वाचवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेनं केलेले गैरकृत्य चव्हाट्यावर आले. या घटनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय कलगीतुराही रंगत आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पुण्यातील एक्साइज कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांना धारेवर धरलं होतं. तसंच उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाइ 'यांच्यावरही गंभीर आरोप केले होते. यावरून आता देसाई यांनी आक्रमक भूमिका घेत मी धंगेकर आणि अंधारे यांना नोटीस बजावणार असल्याचं म्हटलं आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आज शंभूराज देसाई म्हणाले की, आमदार रवींद्र धंगेकर आणि सुषमा अंधारेयांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुण्यातील कार्यालयात जाऊन जाब विचारला. वास्तविक पुण्यातील घटनेनंतर उत्पादन शुल्क विभागाने अनेक ठिकाणी कारवाई केली आहे.

परंतु धंगेकर आणि अंधारे यांनी आंदोलन करताना हातात पैसे घेून आंदोलन केले आणि माझा फोटो असलेले खोके हातात घेतले होते. याप्रकरणी मी त्यांना नोटीस बजावणार आहे. पुढील ३ दिवसांत त्यांनी आपलं वक्तव्य मागे घ्यावे, अन्यथा मी कायदेशीर कारवाईसाठी पुढाकार घेणार आहे, असा इशारा देसाईंनी दिला आहे.

पुणे शहर गुन्हे शाखेने सोमवारी सकाळी ससून रुग्णालयातील डॉ. अजय तावरे आणि डॉ. श्रीहरी हलनोर या दोघा डॉक्टरांना कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाच्या रक्ताच्या नमुन्यात फेरफार केल्याप्रकरणी अटक केली. त्यानंतर आमदार रवींद्र धंगेकर यांनी पुण्यातील उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयावर धडक दिली. त्यांच्याबरोबर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे सुद्धा होत्या. धंगेकर यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना शहरात अवैधरित्या चालणारे पब आणि ड्रग्जच्या मुद्द्यावरुन चांगलेच सुनावले आहे.

## महाराष्ट्रासह या ४ राज्यात काँग्रेस जोरदार मुसंडी मारणार, जयराम रमेश यांचा दावा



**मुंबई :** लोकसभा निवडणूक अंतिम टप्प्यात आली आहे. येत्या १ जून रोजी सातव्या अन् शेवटच्या टप्प्यातील मतदान होणार आहे. तत्पूर्वी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी मोठी भविष्यवाणी केली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत २००४ सारखी परिस्थिती पाहायला मिळेल, असा दावा त्यांनी केला आहे. तसेच,काँग्रेसआणि I.N.D.I. A. आघाडी देशातील अनेक राज्यांमध्ये चमकदार कामगिरी करेल, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत जयराम रमेश म्हणाले, I.N.D.I. A. आघाडी यावेळी देशातील अनेक राज्यांमध्ये चांगली कामगिरी करेल. काँग्रेस पक्ष २० वर्षांपूर्वीस म्हणजेच २००४ सारख्या स्थितीकडे वाटचाल करत आहे. पक्ष राजस्थान, कर्नाटक, तेलंगणा आणि महाराष्ट्रात काँग्रेस मोठी मुसंडी मारेल. याशिवाय छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि आसाममध्येही पक्षाची स्थिती सुधारेल. पहिल्या दोन टप्प्यांनंतर दक्षिणेत भाजपचा सफाया झाला आहे आणि उत्तरेत निम्म्यापेक्षा कमी जागा मिळणार आहेत, असे ते म्हणाले. २००४ च्या निकालावर जयराम रमेश काय म्हणाले?

यावेळी रजराम रमेश यांनी एक्झिट पोलवर प्रश्न उपस्थित केले. २००४ मध्ये एक्झिट पोलने NDA ला प्रचंड बहुमत मिळण्याची शक्यता वर्तवली होती, पण प्रत्यक्षात निकाल उलटच झाला. २०१९ मध्ये काँग्रेसला राजस्थानमध्ये ०, कर्नाटक आणि महाराष्ट्रात १ जागा मिळाली. पण, आता भाजपला उत्तर प्रदेशात ६२, बिहारमध्ये ३९ आणि पश्चिम बंगालमध्ये १८ जागा जिंकणेही अशक्य आहे. यावेळी I.N.D.I. A. आघाडीला स्पष्ट आणि निर्णायक बहुमत मिळणार आहे, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

## मनुस्मृतीच्या विरोधात मी उभा राहणार, जितेंद्र आव्हाड गरजले!

**मुंबई :** विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे मूल्य रुजावे यासाठी मनुस्मृतीच्या श्लोकाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्याच्या चर्चेवरून वाद चालू आहे. याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड यांनी महाडमधील चवदार तळ्यावर जाऊन मनुस्मृतीचे दहन केले. यावेळी त्यांच्याकडून चुकून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटोफाडला गेला. या घटनेनंतर त्यांनी जाहीरपणे माफी मागितली आहे. हाच मुद्दा घेऊन भाजपकडून राज्यभरात आव्हाड यांच्याविरोधात आंदोलन केले जात आहे. त्यांच्या प्रतिमेला काळे फासले जात आहे. यावर आता आव्हाड यांनी पत्रकार परिषद घेत त्यांची भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे. काहीही झालं तरी मी मनुस्मृतीला विरोध करणार, असं आव्हाड यांनी ठणकावून सांगितलंय.



९७ वर्षानंतर आम्ही त्याच जागेवर मनुस्मृती जाळली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो अनावधानाने फाडला गेला. आमच्याकडून चूक झाली. आम्ही त्याच्याबद्दल माफी मागितली. आमच्यावर गुन्हेही दाखल झाले. मला फाशी द्या. मी मनस्मृती आणि सनातनी मनुवादाच्या विरोधात उभा राहणार आहे. मी मरणाला न घाबरणारा कार्यकर्ता आहे. जो जातीभेद, वर्णाश्रम, स्त्री द्वेषाची बिजे पेरली गेली, आपल्या समाजात स्त्रीला मान्यताच नव्हती. महात्मा ज्योतीबा फुले आले नसते तर स्त्रिया शिकल्याच नसत्या. स्त्रियांना जगण्याचाच अधिकार नाही, असे मनुने लिहिलेले आहे. मनू काय बोलतोय त्याबद्दल बोला. जितेंद्र आव्हाड चुकला आहे. मी मोठ्या मनाने माफी मागितली आहे.

मला आनंद आहे की, छगन भुजबळ, जयंत पाटील, सुषमा अंधारे, दलित पँथरचे दीपक केदार असे अनेकजण माझा उद्देश काय आहे हे बघा असे म्हणाले आहेत. जितेंद्र आव्हाड हे करूच शकत नाहीत. त्यांच्याकडून चुकून झालं, अनावधानानं झालं हे मान्य आहे. पण आव्हाड यांनी जाणूनबुजून केलं हे म्हणणं चुकीचं आहे, असं अनेक दलित समाजाचे कार्यकर्ते म्हणत आहेत. १८५ किलोमीटर लांब जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडायला मी मुर्ख आहे का?

उलट आम्हालाच वाईट वाटत आहे की, सगळा कार्यक्रम चांगला झाला. पण शेवटी ती घटना घडली. त्या घटनेमुळे सगळ्यावर पाणी फिरलं. ९७ वर्षानंतर कोणीतरी मनुस्मृतीचं दहन केलं.

# बाबासाहेबांचा अपमान केल्याचा आरोप करत भाजपचं आव्हाडांविरोधात आंदोलन

**रत्नागिरी :** महाडच्या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाडांनी बाबासाहेबांचा अवमान केल्याचा आरोप भाजपने केलाय. भाजप आणि आरपीआय आज आव्हाडांविरोधात राज्यभर आंदोलनं करत आहे. नागपुरातही भाजपच्यावतीनं आंदोलन करण्यात आलं. कोल्हारपुरातही आव्हाडांविरोधात आंदोलन करण्यात आलं. तसंच ठाण्यातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या खाली भाजपनं आंदोलन केलं, तर मुंबईत मंत्रालयाबाहेर भाजपने आव्हाडांविरोधात आंदोलन केलं.

हिंगणघाट येथे भाजपच्या वतीनं जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारत आंदोलन. जितेंद्र आव्हाड यांचा बोलवता धनी शरद पवार असून भविष्यात आव्हाडांना हिंगणघाटमध्ये पाय ठेवू देणार नाही, असा इशारा आमदार कुणावार यांनी दिला आहे.



**कोल्हापूरच्या ऐतिहासिक बिंदू चौकात जोडो मारो आंदोलन**

जितेंद्र आव्हाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याच्या निषेधार्थ कोल्हापूर भाजपकडून आंदोलन करण्यात आले आहे. कोल्हापूरच्या ऐतिहासिक बिंदू चौकात जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करण्यात आले आहे.

**भाजप कार्यकर्ते रस्त्यावर उतरले**

माणगांवमध्ये भाजपकडून जितेंद्र आव्हाड यांचा निषेध करण्यात आला आहे. भाजप कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत. मुंबई गोवा हायवेवर जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आव्हाडांच्या प्रतिमेचंही दहन केलं. आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचीही मागणी केली आहे.

**रत्नागिरीत आव्हांडाचा प्रतिकात्मक पुतळा जाळला**

रत्नागिरी शहरात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भाजपचं जितेंद्र आव्हाडांविरोधात आंदोलन केले आहे. आव्हाडांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आव्हाड यांचा प्रतिकात्मक पुतळाही जाळला.

**जितेंद्र आव्हाडांविरोधात भाजप आक्रमक**

जितेंद्र आव्हाडांविरोधात भाजप आक्रमक आहे. मुंबईत भाजपच्या वतीने आंदोलन करण्यात आले. भाजप युवा मोर्चा अध्यक्ष तेजंदर सिंग तिवाना यांच्या नेतृत्वखाली मंत्रालय परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.

### सांगलीत जोडेमारो आंदोलन

**सांगलीत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआयकडून जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेस जोडेमारो आंदोलन झाले आहे. या आंदोलनात भाजपा आमदार सुधीर गाडगीळ, आरपीआय नेते जगन्नाथ ठोकळे, राष्ट्रवादी पदाधिकारी जयश्री पाटील अन्य पदाधिकारी सहभागी झाले होते.**

### नांदेडमध्ये जोडे मारो आंदोलन

**नांदेडमध्ये जितेंद्र आव्हाड यांच्या पुतळ्याला भाजप कार्यकर्त्यांकडून जोडे मारले. नांदेड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात आंदोलन करण्यात आलं . यावेळी आव्हाडांच्या अटकेची मागणी करण्यात आली.**

### माणगाव भाजप आंदोलन

**माणगांवमध्ये भाजपकडून जितेंद्र आव्हाड यांचा निषेध करण्यात आला. भाजप कार्यकर्ते उतरले रस्त्यावर आहेत. मुंबई गोवा हायवेवर जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आव्हाडांच्या प्रतिमेचंही दहन केलं. आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचीही मागणी केली.**

# संपादकीय

## काश्मीरमध्ये 'लोकशाही'?

जम्मू-काश्मीरमध्ये चार दशकांनंतर यंदा लोकसभा निवडणुकीमध्ये सर्वाधिक मतदान झाले आहे. हा भाजप आणि केंद्र सरकारच्या धोरणांचा विजय मानायचा की, काश्मीर खोऱ्यातील जनतेची खदखद मतदानातून बाहेर पडली म्हणायचे? यंदाच्या लोकसभा निवडणुकीत काश्मीर खोऱ्यातील एकाही जागेवर भाजपने उमेदवार उभा केला नाही. ही खरेतर भाजपची पळवाट म्हटली पाहिजे. भाजप लढत नसेल तर त्यांच्याविरोधात काश्मिरी जनतेने कौल दिला असे थेट म्हणता येत नाही. भाजपने निवडणूक लढवली असती आणि उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली असती तर भाजपला पराभवाची कारणे द्यावी लागली असती. पण उमेदवार नाही, जय-पराजयही नाही. उलट, आता मतदारांनी भरघोस मतदान केल्यामुळे काश्मिरी जनतेलाही लोकशाही प्रिय असल्याचे भाजपला उजळ माथ्याने सांगताही येऊ शकेल! एप्रिलमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी जम्मूमधील निवडणुकीच्या प्रचारसभेत सांगितले की, आम्हाला काश्मिरी जनतेची मने जिंकायची आहेत. खोऱ्यामध्ये कमळ फुलावे याची आम्हाला घाई नाही.

तरीही काश्मीर खोऱ्यातील बारामुल्ला, श्रीनगर आणि अनंतनाग-राजौरी या तीन लोकसभा मतदारसंघांमध्ये यावेळी झालेल्या मतदानाची तुलना १९८४ मधील मतदानाशी करता येऊ शकेल. त्यानंतर खोऱ्यात सुरू झालेला हिंसाचार अजूनही थांबलेला नाही. ऑगस्ट २०१९मध्ये केंद्र सरकारने काश्मीरचा विशेषाधिकार काढून घेतल्यानंतर पहिल्यांदाच खोऱ्यात निवडणूक झाली आहे. काश्मिरी मतदार मतदानावर बहिष्कार टाकतील असे निवडणुकीपूर्वी बोलले जात होते. पण झाले नेमके उलटे. अनंतनाग-राजौरीमध्ये ५४.४६ टक्के मतदान झाले. २०१९ मध्ये जुन्या अनंतनाग मतदारसंघात केवळ ८.९८ टक्के मतदान झाले होते. यंदा श्रीनगरमध्ये ३८.४५ टक्के; तर बारामुल्लामध्ये ५९.१० टक्के मतदानाची नोंद झाली. २०१९ मध्ये या दोन्ही मतदारसंघामध्ये अनुक्रमे १४.४३ टक्के व ३४.६० टक्के मतदान झाले होते. आता १९८४ची आकडेवारी बघा. तीनही मतदारसंघांमध्ये अनुक्रमे ७०.०८ टक्के, ७३.५१ टक्के आणि ६१.०९ टक्के मतदान झाले होते. साधारण १९८५-८९ पासूनच बारामुल्ला, अनंतनाग हे दोन्ही जिल्हे दहशतवादाची केंद्रे मानली जातात. तिथे यंदा मात्र मतदारांनी रांगा लावून मतदान केले.

बारामुल्लामध्ये १९८४ व २०२४ या दोन्ही निवडणुकीतील मतटक्क्यातील फरक फक्त २ टक्के आहे. दोन्ही काळांत दहशतवादाचे प्रमाण नीचांकी होते, तेव्हा मतदानाचा टक्का वाढला असे म्हणता येईल. पण यावेळी झालेले मतदान म्हणजे लोकांनी केंद्र सरकारविरोधात व्यक्त केलेला रागही असू शकतो. सहा-सात वर्षांपूर्वी खोऱ्यात लष्करी जवानांवर दगडफेक करून केंद्राविरोधात संतप्त उद्रेक होत असे. विशेषाधिकार काढून घेतल्यानंतर दोन-अडीच वर्षांच्या काळात संपूर्ण खोरे टाळेबंदीत होते. त्यानंतर पुढील दोन वर्षांमध्ये लोकांना रस्त्यावर उतरून विरोध दर्शवता आला नाही. खोऱ्यात आता दगडफेक होत नाही, तेवढे बळ आत्ता तरी खोऱ्यामध्ये नाही. त्यामुळे कदाचित लोकांनी मतदान करून अप्रत्यक्षपणे खोऱ्यातील केंद्राच्या धोरणाबाबत मत व्यक्त केले, असाही अर्थ काढता येऊ शकेल! काश्मीरचा विशेषाधिकार काढून केंद्र सरकारने भाजपचा 'ऐतिहासिक' अजेंडा पूर्ण केला हे खरे असले तरी, हा निर्णय जम्मू-काश्मीरमधील जनतेला न विचारता घेण्यात आला आहे. जून २०१८ पासून इथे राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. विधानसभा भंग झाल्यामुळे काश्मिरी जनतेला लोकशाही मार्गाने मत मांडण्याची संधी दिली गेलेले नाही. लोकांना खुलेपणाने बोलता येत नाही, उर्वरित भारताप्रमाणे रस्त्यावर उतरून विरोध प्रदर्शन करता येत नाही, आंदोलन करता येत नाही. मग, काश्मिरी जनतेने काय करायचे, हा प्रश्न केंद्र सरकार वा मोदी-शहांनी सोडवलेला नाही. हा राज्याचा दर्जा हिसकावून घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दोन महिन्यांपूर्वी पहिल्यांदा श्रीनगरला भेट दिली. खोऱ्यात इतरही समस्या आहेत. बेरोजगारी, महागाई, विजेचा तुटवडा, रस्त्यांचा विकास अशा पायाभूत समस्यांनी खोरे ग्रस्त आहे. यावेळी मतदानासाठी बाहेर पडलेल्या महिलांची संख्या पाहिली तर या समस्यांकडे तातडीने लक्ष देण्याची गरज लक्षात येईल. श्रीनगरमध्ये महिलांच्या मतदानाचे प्रमाण (२०१९) १२.६७ वरून ३३.२१ टक्क्यांवर पोहोचले. बारामुल्लामध्ये ते ३१.७६ वरून ५५.६३ टक्के झाले. अनंतनाग-राजौरीतील आकडेवारी उपलब्ध झालेली नाही. काश्मीर खोऱ्यात मतदारांनी दिलेला प्रतिसाद पाहता इथे तातडीने विधानसभेची निवडणूक घेण्याची आणि राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्याची गरज स्पष्ट होते.

# जितेंद्र आव्हाडांवर गुन्हा दाखल करा

## मावळ तालुका भाजपाची मागणी

**वडगाव मावळ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याप्रकरणी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा,अशी मागणी करत मावळ तालुका भाजपाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत वडगाव मावळ पोलीस ठाण्यात तक्रारी निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी गणेश भेगडे, भाजपाचे प्रभारी रविंद्र भेगडे, माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर वडगाव शहराध्यक्ष संभाजी म्हाळसकर, सुधाकर ढोरे




अभिमन्यू शिंदे, रविंद्र शिंदे,किरण म्हाळसकर, रविंद्र म्हाळसकर विजय जाधव, आतिश ढोरे मकरंद बवरे, प्रसाद पिंगळे , प्रकाश देशमुख,यांच्यासह कार्यकर्त्यांनी आंदोलन केले.

निवेदन तक्रारीत म्हटले आहे शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा समावेश करण्याच्या निषेधार्थ आव्हाड यांनी महाड येथे मनुस्मृतीच्या प्रतीचे दहन केले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र असलेले पोस्टर फाडण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला आहे हे देशद्रोही कृत्य आहे अशा देशद्रोही कृत्य करणाऱ्या वर गुन्हा दाखल करा अशी मागणी मावळ तालुका भाजपाच्या वतीने पोलिसांना निवेदनाद्वारे केली आहे

# ग्रामीन भागात लोकसभा निकालाची उत्सुकता



**देऊळगाव राजे :** लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या चर्चा रंगू लागल्या देशातील लोकसभा निवडणुका झाल्या आहेत त्याचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे त्याची उत्सुकता आता ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे,

ग्रामीण भागातील नागरिक सकाळी गावात आल्यानंतर या निवडणुकीत कोण बाजी मारणार यावर तासन तास गप्पा मारत आहेत ,प्रत्येक जण आपल्या पक्ष कसा विजयी होईल याबाबत बोलत आहे तर काही राजकीय विश्लेषण आपले अंदाज व्यक्त करीत आहेत त्याप्रमाणेच ग्रामीण भागातही प्रत्येक ठिकाणी लोकसभा निवडणुकीचा निकाल काय असेल यावर चर्चा चालू आहे. केंद्रात कोणाचे सरकार असणार आहे आणि बारामती लोकसभा मतदारसंघात कोणता उमेदवार निवडून येणार आहे यावर मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे.

सध्याची परिस्थिती पाहता लोकसभेचा निकाल काय असेल असा प्रश्न ग्रामीण भागातील ग्रामस्थांना पडला आहे.

मुख्य लढत ही भाजप आणि इंडिया प्रणित आघाडी यांच्या उमेदवारांमध्ये झाली आहे

२०१९ साली जेवढ्या जागा भाजप आणि एनडीएने जिंकल्या आहेत तेवढ्याच जागा कायम राहतील असा अंदाज राजकीय विश्लेषक वर्तवीत आहेत.

# जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेस जोडे मारुन रिपाइंने केला जाहीर निषेध

**हडपसर :** शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती आणण्याच्या निषेधार्थ आमदार जितेंद्र आव्हाड यांनी महाड येथे मनुस्मृती दहन आंदोलन घेतले हौते. आंदोलन करताना जितेंद्र आव्हाड व त्यांच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलनात मनुस्मृती दहन. करताना.त्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा होती ती जितेंद्र आव्हाड यांनी फोडल्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याप्रकरणी दलित आंबेडकरी समाजाच्या भावना दुखावल्याने हडपसर मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने हडपसर उड्डाणपूलाखाली हडपसर रिपाइं विधानसभा अध्यक्ष



महादेव दंदी यांच्या नेतृत्वात जितेंद्र आव्हाड यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करीत, आव्हाड यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत झाल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा या विषयीचे निवेदन हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

आंदोलनात हडपसर विधानसभा अध्यक्ष महादेव दंदी,रिपाइं पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा शशीकलाताई वाघमारे, मिना गालटे, पुणे शहर उपाध्यक्ष कालिदास गायकवाड, उध्दव शिलवंत,यादव हरणे, संतोष खरात,महादेव कांबळे, रामभाऊ कर्वे , राजू कांबळे, राजू शितोळे , शंकर चौधरी ,शंकर पवार,विशाल गायकवाड, महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वंडरलँड इंग्लिश मिडीयम स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**हडपसर :** हडपसर मधील हांडेवाडीरोड असलेल्या वंडरलँड इंग्लिश मिडीयम स्कूलचा एस.एस.सी.बोर्ड परीक्षेचा निकाल १०० % लागला असून २०२४ मधील दहावी बोर्ड परिक्षेत एकुण ७८ विद्यार्थी परिक्षेस बसले होते यातील पैकीच्या पैकी सर्व विद्यार्थी पास झाले. यावर्षी ही परिक्षेत पास होण्याची परंपरा राखत वंडरलँड शाळेचा निकाल शंभर टक्के लागल्याने सर्व विद्यार्थी चांगल्या मार्कानी पास झाले

यात कु.सूर्यवंशी नम्रता उत्तम- ९३.२०% कु.लोहार प्राची दलपतकुमार- ९०.८०% कु.डोळसे सृष्टी बाबासाहेब- ८९.८०% कु.गाडेकर अभिजीत नंदू- ८९.४०% कु.झांबरे सानिका अशोक- ८९.२०%कु.चौधरी मोहम्मद आतिफ सलिम- ८८.८०

# उत्तराखंडमधील पवित्र चारधाम दर्शनासाठी भाविकांनी नोंदणी करावी : अशोक शिनगारे

**मुंबई :-** उत्तराखंडमध्ये पवित्र चारधामला भेट देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उत्तराखंड शासनाने या काळात होणाऱ्या गर्दी व्यवस्थापनसाठी दि.३१ मे, २०२४ पर्यंत कोणत्याही प्रकारची व्हीआयपी दर्शनसुविधा देण्यात येणार नसल्याचे एका पत्राद्वारे सर्व राज्यांना कळविले असून पवित्र चारधाम दर्शनासाठी भाविकांनी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

चारधाम यात्रेतील दर्शनाची प्रक्रिया सुसंगत करण्यासाठी, उत्तराखंड सरकारने चारधाम यात्रेसाठी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. सर्वांसाठी नोंदणी अनिवार्य आहे. तरी सर्व भक्तांनी चारधाम यात्रा २०२४ च्या नोंदणीसाठी https://registrationandtouristcare.uk.gov.in/ या संकेतस्थळावर भेट द्यावी. नोंदणी केलेल्या यात्रेकरुंनाच दर्शनासाठी परवानगी देण्यात येईल.

तसेच वरिष्ठ नागरिकांनी चारधाम यात्रेपूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे.आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनाचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन उत्तराखंड शासनाने केले आहे.

उत्तराखंड शासनाने केलेल्या आवाहनानुसार ठाणे जिल्ह्यातील चारधाम यात्रेसाठी जाण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांनी नाव नोंदणी करावी तसेच आरोग्यविषयक मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

## दारूचे बिल मागितल्याच्या कारणावरून दोघांना लोखंडी पाईपने बेदम मारहाण

**लोणी काळभोर :** हवेली तालुक्यातील सोरतापवाडी येथील परमिट रुममध्ये पिलेल्या दारूचे बिल मागितल्याच्या कारणावरून सहा जणांनी दोघांना लोखंडी पाईपने बेदम मारहाण केली. तसेच शिवीगाळ व दमदाटी करुन तसेच बारच्या खिडकीची काच फोडून नुकसान केले आहे. याचबरोबर हॉटेलच्या बाहेर लावलेल्या आय - २० व फॉर्च्युनर या दोन गाड्यांचेही नुकसान केल्या प्रकरणी ६ जणांवर उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकार बुधवार (२९ मे) रोजी रात्री १०.४५ वाजण्याच्या सुमारांस हॉटेल अभिराज (नायगाव फाटा, सोरतापवाडी ता. हवेली) येथे घडला आहे. याप्रकरणी हॉटेल व्यवस्थापक मोहन वासु गौड (वय ४३, सध्या रा. हॉटेल अभिराज नायगाव फाटा, सोरतापवाडी ता. हवेली, मुळ गाव महाराज बिल्डींग ब्राम्हनगर, ता. माझगाव जि. बेळगाव, राज्य - कर्नाटक) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यांवरून स्वप्निल चौधरी (रा. पेठ वडाची वाडी ता. हवेली), यश (पुर्ण नाव माहीत नाही), नंदु उर्फ हनुमंत चोरगे (रा. म्हातोबाची आळंदी ता. हवेली), यश संपत चैधरी (रा. वडाची वाडी पेठ ता. हवेली) शिवम शिवरकर (रा. म्हातोबाची आळंदी ता. हवेली) उत्कर्ष बाबर (रा. सोरतापवाडी, कडवस्ती ता. हवेली) यांचेविरोधांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार वरील सहा जन परमिट रूममध्ये आले व दारु पिले. त्यानंतर गौड यांनी त्यांना पिलेल्या दारूचे बिल मागितले. याचा त्यांना राग आल्याने स्वप्नील चौधरी व हनुमंत चोरगे यांनी व्यवस्थापक गौड व महेश पोपट चौधरी यांना लोखंडी पाईपने मारहाण व दमदाटी करून शिवीगाळ केली. तसेच शटरवर दगडफेक केल्याने त्यातील दगड हॉटेलमधील कामगार बबलु अंन्सारी यास लागून जखमी केले.

यानंतर त्यांनी बारच्या खिडकीची काच फोडून नुकसान केले.

तसेच बाहेर उभ्या असलेल्या आय २० व फॉर्च्युनर या दोन चारचाकीवर दगडाने हल्ला केला. व यामाहा मोटारसायकल ने धडक देऊन दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान केले. त्यानंतर शिवीगाळ करत ते निघून गेले. दहा दिवसांपूर्वी कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील लोणी स्टेशन चौकातील हॉटेल आशीर्वादच्या शेजारी यातील काही आरोपींनी किरकोळ कारणावरून लाथा बुक्क्यांनी तसेच दगड व विटाच्या सहाय्याने तिघांना बेदम मारहाण केली होती. याप्रकरणी याच आरोपींवर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## जम्मूमध्ये पोलीस ठाण्यावर हल्ला; लष्कराच्या १६ जवानांवर गुन्हा दाखल

जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराच्या १६ जवानांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व लष्करी जवानांवर कुपवाडा जिल्ह्यातील पोलिस ठाण्यामध्ये पोलिसांवर हल्ला केल्याचा आरोप आहे. यामध्ये तीन लष्करी अधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

पोलिसांनी अधिकाऱ्यांसह १६ लष्करी जवानांवर गुन्हा दाखल केला आहे, जवानांच्या हल्ल्यात पोलिस ठाण्यात प्रभारीसह पाच पोलिस जखमी झाले आहेत. ही घटना मंगळवारी रात्री उशिराची असल्याचे सांगण्यात येत आहे. ज्या १६ लष्करी जवानांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे, त्यात लेफ्टनंट कर्नल दर्जाच्या तीन अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. त्यांच्याविरुद्ध पोलिस ठाण्यात दंगल, खुनाचा प्रयत्न आणि पोलिसांचे अपहरण अशा आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुंबईकरांनो पाणी जपून वापरा, ३ व ४ जूनला पाणी कपात

**मुंबई :** रुरकी येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या प्राध्यापकांमार्फत ३ आणि ४ जून २०२४ रोजी मलबार हिल जलाशयाची अंतर्गत पाहणी करण्यात येणार आहे. त्यासाठी जलाशयाचा कप्पा क्रमांक १ आणि २ टप्प्या-टप्प्याने रिक्त करण्यात येणार आहे. त्यामुळे ३ आणि ४ जून या कालावधीत कुलाबा/ए, चंदनवाडी/सी, ग्रँट रोड/डी, वरळी/जी दक्षिण आणि दादर/जी उत्तर विभागातील काही भागांतील पाणीपुरवठ्यात कपात केली जाणार आहे.

पालिकेकडून मलबार हिल जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. जलाशयाच्या कामाचे पुनर्विलोकन करण्यासाठी स्थापन केलेल्या आधीच्या विशेषज्ञ समितीच्या अहवालांचे विश्लेषण करण्यासाठी आणि मलबार टेकडी जलाशयातून मुंबई शहराला होणारा पाणीपुरवठा बाधित न करता जलाशयाच्या कामाची योग्य कार्यपद्धती सुचविण्यासाठी पालिकेतर्फे आयआयटीच्या तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे.सोमवार ३ जून २०२४ कुलाबा/ए सकाळी ८ ते सकाळी १० वाजेपर्यंत कफ परेड व आंबेडकर नगर (पाणीपुरवठ्याची वेळ सकाळी ११.२० ते दुपारी १.४५) पाणीपुरवठा बंद.

नरिमन पॉईंट व जी. डी. सोमाणी मार्ग (पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी १.४५ ते दुपारी ३) पाणीपुरवठ्यात ५० टक्के कपात

मिलिटरी झोन (२४ तास पाणीपुरवठा ) (पाणीपुरवठ्यात ३० टक्के कपात)

चंदनवाडी/सी सकाळी ८ ते सकाळी १० मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'ए' विभागातील सर्व क्षेत्र. पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात

ग्रँट रोड/डी सकाळी ८ ते सकाळी १० पेडर रोड पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी १ ते रात्री १०.३०) पाणीपुरवठ्यात २० टक्के कपात, दादर/जी उत्तर व वरळी/जी दक्षिण सकाळी ८ ते सकाळी १०

जी उत्तर व जी दक्षिण विभागातील थेट पाणीपुरवठा होणारे सर्व विभाग पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात केली जाणार आहे.

मंगळवार दि ४ जून २०२४ रोजी कुलाबा/ए विभाग सकाळी ८ ते सकाळी १० मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'ए' विभागातील सर्व क्षेत्र. पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात, चंदनवाडी/सी सकाळी ८ ते सकाळी १० मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'सी' विभागातील सर्व क्षेत्र. पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात, ग्रँट रोड/डी विभाग सकाळी ८ ते सकाळी १०. मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'डी' विभागातील सर्व क्षेत्र. पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात, तर दादर/ जी उत्तर व वरळी/जी दक्षिण सकाळी ८ ते सकाळी १० जी उत्तर व जी दक्षिण विभागातील थेट पाणीपुरवठा होणारे सर्व विभाग पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात केली जाणार आहे,

# महामानवांचा अपमान खपवून घेणार नाही : शंकर जगताप

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड या विकृताने महामानव, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला आहे, महामानवांचा अवमान खपवून घेणार नसून, आव्हाड यांसारख्या वृत्तींना वेळीच ठेचून त्यांच्या पक्षाने आव्हाडांवर कारवाई करावी. तसेच, त्यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर फाडल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात पिंपरी चिंचवड शहर भाजपा आक्रमक झाला आहे. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वात भाजप अनुसूचित जाती मोर्चातर्फे आज सकाळी पिंपरी चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून आंदोलन करण्यात आले.

शंकर जगताप म्हणाले की, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मागील काही दिवसांपूर्वी महिला आणि महापुरुषांबददल अपशब्दांचा वापर केला होता. भगवान श्रीराम यांच्याबददल देखील अपशब्दांचा वापर केला होता. अशा वक्त्यांद्वारे समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम आव्हाड यांच्याकडून सूरू आहे. त्यांच्या पक्षाकडून याबाबत कुठलीही दखल घेतली जात नसल्याने त्यांच्या पक्ष श्रेष्ठींकडून या घटनेचे समर्थन होत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातून या घटनेचा खेद व्यक्त होत असून, याची वेळीच दखल न घेतल्यास भाजपा कार्यकर्ते जितेंद्र आव्हाड यांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असेही ते म्हणाले.

प्रसंगी, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष भीमा बोबडे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे यांनी देखील मते व्यक्त करून या घटनेचा निषेध नोंदविला. दक्षिण आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश पिल्ले यांनी आव्हाड यांच्या विरोधात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करणार असल्याचे यावेळी जाहीर केले. आमदार जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात घोषणाबाजी देण्यात आली. तसेच, त्यांच्या प्रतिमेला जोडे मारून या घटचेना निषेध नोंदविण्यात आला.

सरचिटणीस संजय मंगोडेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, शैला मोळक, माजी महापौर आर. एस.कुमार, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, निलेश अष्टेकर, अनुसुचित जाती मोर्चा प्रदेशचे मनोज तोरडमल, धनराज बिरदा, अजित कुलथे, वैशाली खाडये, शिवदास हांडे, दिपक भंडारी, संतोष रणसिंग, बाळासाहेब भुंबे, डॉ. संतोष शिंदे, नंदू कदम, सचिन उदागे, देवदत्त लांडे, रजिंद्र वायसे, नंदू भोगले, महेश बारसावी, मा. नगरसेवक माऊली थोरात, बाळासाहेब त्रिभूवन, सागर आंघोळकर, अनुराधा गोरखे, गोपाळ माळेकर, ॲड. दत्ता झुळूक, मंजू गुप्ता, प्रीती कामतीकर, अमेय देशपांडे, सीमा चव्हाण, अश्विनी कांबळे, पल्लवी पाठक, दिपाली कलापूरे, शोभा थोरात, मनोज ब्राम्हणकर, युवराज ढोरे, दत्तात्रय ढगे, समीर जवळकर, ॲड. गोरक्षनाथ झोळ, गणेश ढाकणे, प्रतिभा जवळकर, आरती सोनवणे, सीमा बोरसे यांच्यासह विविध आघाडयांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथील च वदार तळे येथे अस्पृश्यते विरोधात सत्याग्रह आंदोलन केले होते. जातीभेद नष्ट करण्याच्या दृष्टीने बाबासाहेबांनी हे आंदोलन केले. या महामानवाचा अवमान करण्याचे पाप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे.

बाबासाहेब हे प्रत्येक भारतीयांचे आदर्श आहेत. आदर्श महापुरुषाचा हा अवमान आम्ही कदापिही खपवून घेणार नाही. या कृत्यावरून आव्हाडांच्या मनात परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल किती श्रद्धा आणि निष्ठा आहे हे दिसून येते. स्वतः ला पुरोगामी म्हणायचे आणि असे कृत्य करायचे हे शोभनीय नाही. यानिमित्ताने त्यांचा खरा चेहरा समोर आला आहे. त्यांचा आम्ही जाहीर निषेध केला आहे. - शंकर जगताप, भाजपा शहराध्यक्ष

**अधिक माहितीसाठी संपर्क : निलेश हाडमोडे**

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# पालखी सोहळ्यातील लाखो वारकऱ्यांचा मार्ग होणार खडतर

**सोलापूर :** गेल्या वर्षी आषाढी सोहळ्याची कामे रखडल्याचे वृत्त '-इझ माझा'ने दाखवल्यावर मुख्यमंत्र्यांनी यात्रेपूर्वी येऊन तयारीची पाहणी केल्याने कशीतरी कामे पूर्ण होऊ शकली होती. यंदाही त्यापेक्षा गबाळ कारभार सध्या सुरु असून वाखरी ते पंढरपूर हा राष्ट्रीय महामार्गातून सुरु असलेले काम रखडल्याने पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या लाखो भाविकांचा मार्ग खडतर बनविणार आहे. महत्वाचे म्हणजे ज्या वाखरी पालखी तालावर सर्व मोठे पालखी सोहळे एकत्र येऊन १२ ते १५ लाखांचा भाविकांचा सागर पंढरपूरकडे जातो त्या मार्गाचीच कामे रखडली आहेत. यामुळे पालखी सोबत येणाऱ्या भाविकांना पंढरपूरपर्यंत पोहोचताना अनेक अडथळ्यांना पार करीत आणि त्रासाला सामोरे जात हा पाच किलोमीटरचा मार्ग पूर्ण करावा लागणार आहे.



वाखरी ते पंढरपूर मार्गावर केंद्रीय रस्ते मंत्री नितीन गडकरी यांनी सिमेंट महामार्ग मंजूर केला आणि त्याला जवळपास ८२ कोटींचा निधी देखील वर्ग केला. मात्र वाखरी ते इसबावी या मार्गावर गेल्या सहा महिन्यापासून काम सुरु करूनही योग्य नियोजन होत नसल्याने काम अर्धवट अवस्थेत आहे.

## वाखरी-पंढरपूर रस्त्याचं काम रखडलं

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सातत्याने याचा पाठपुरावा करीत असले तरी एकाचवेळी सर्वच ठिकाणी रस्ते खोदून ठेवल्याने आता कामे पूर्ण करताना अडचणी समोर येत आहेत.

वाखरी पालखी तळाच्या बाहेत पडताना फक्त रस्त्याची एक बाजू पूर्ण होऊ शकली असून त्यातूनही लोखंडी बार बाहेर आले असल्याने भाविकांसाठी हे फार धोकादायक बनणार आहे. किमान वाखरी पालखी तळाच्या परिसरात दुहेरी रास्ता पूर्ण करणे गरजेचे होते. याशिवाय वाखरी ते विसावा या मार्गात ठिकठिकाणी मोठे मोठे चढ कमी करून सपाटीकरण केल्याने शेजारच्या रस्त्यात फार मोठा उंचीत फरक पडला आहे.

अशावेळी लाखोंच्या संख्येने भाविक पंढरपूरकडे येत असताना या धोकादायक ठिकाणी तातडीने बॅरेकेटिंग करावे लागणार आहे. याच मार्गावर असणाऱ्या पुलाची कामेही रखडल्याने आता ही कामे कधी पूर्ण होणार असा सवाल उपस्थित केला जात आहे. कामे वेळेत करण्यासाठी वेगाने कामे उरकल्यास कामाचा दर्जा कसा राखू शकणार असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

अगदी माऊली आणि तुकाराम महाराजांची पालखी विसावा येथे येते तेथे उभे रिंगण होत असते. मात्र येथील पुलाचे कामही अर्धवट राहिल्याने पालखी सोहळा येण्यापूर्वी ही कामे पूर्ण करून घेणे प्रशासनाच्या समोर मोठे आव्हान ठरणार आहे. अशातच पुढेही काही ठिकाणी खोदकामाला मूर्खपणासारखी सुरुवात केल्याने आता मुख्यमंत्र्यांनीच पाहणी केल्याशिवाय भाविकांना आषाढी सुकर होऊ शकणार नाही असे चित्र आहे. वाखरी ते विसावा या मार्गावरील कामे सुरुवातीला १० जूनपर्यंत पूर्ण करून देण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या होत्या. यानंतर पुन्हा या ठेकेदाराला २५ जून पर्यंतची वेळ वाढवून दिली असली तरी ही कामे पूर्ण नाही झाली तर लाखो वारकऱ्यांना वाखरी ते विसावा हे अंतर पार करणे फारच त्रासाचे आणि जिकिरीचे होणार आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी थोडे आधी येऊन प्रशासनाला याबाबत आदेश दिले तर पालखी सोहळ्याला देवाच्या दारात प्रवेश करताना परमानंद अनुभवायला मिळेल एवढे मात्र नक्की.

# नाशिकला पाणी टंचाईच्या तीव्र झळा

## पेठला दोन हंड्यांसाठी दीड किमीची पायपीट

**नाशिक :** जिल्ह्यात पाणी टंचाईचे संकट दिवसेंदिवस अधिक गडद होत चालले आहे. नाशिककरांची तहान भागावणाऱ्या गंगापूर धरणात केवळ २५ पाणीसाठा शिल्लक आहे. तर जिल्यातील अनेक धरणांनी तळ गाठला आहे. शहरातील काही भागात टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. ग्रामीण भागातही दुष्काळाची दाहकता दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. नागरिकांना पाण्यासाठी दाही दिशा भटकण्याची वेळ आली आहे.

मनमाडला महिन्यातून एकदाच पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करवा लागत आहे. वाघदर्डी धरणात केवळ २० ते २२ दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. तर पालखेड डाव्या कालव्याच्या आवर्तनावरच मनमाडकरांच्या पाण्याची भिस्त अवलंबून आहे. तर पेठ (झर्शीह) तालुक्यातही भीषण पाणी टंचाई जाणवू लागली आहे. पाण्यासाठी नागरिकांना तब्बल दीड किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे.



**पेठ तालुक्यात भीषण पाणी टंचाई**

**नाशिकच्या पेठ तालुक्यातील वाड्या -वस्तीवरील महिलांना तब्बल दीड ते दोन किलोमीटर पायपीट करून केवळ दोन हंडे पाणी मिळते. हे पाणी आणण्यासाठी तास-दीडतास लागत असल्याचे वास्तव आहे. पेठ तालुक्यात जलजीवन योजनेच्या माध्यमातून ८५ कामे सुरू आहेत. तर ७७ कामे ही निर्धारित मुदत संपूनही पूर्ण करण्यास ठेकेदार अपयशी ठरले आहेत. त्यामुळे जलजिवन योजनेचे पाणी मुरते कुठे? असा सवाल ग्रामस्थ करू लागले आहे. मार्च २०२४ पर्यंत ही योजना पूर्णत्वास नेण्याचे उद्दिष्ट होते. मात्र विहिरींना पाणी नाही, वीजपुरवठा कनेक्शन अपूर्ण आहेत. काही ठिकाणी आर्थिक बजेट वाढल्याने कामे अपूर्ण आहेत. ऐन पाणी टंचाईत या योजनेतील शुल्लक कारणांनी नागरिकांना पाणी टंचाईस सामोरे जावे लागत असल्याने महिला वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे.**

**मनमाडला महिन्यातून एकदाच पाणीपुरवठा**

पाणीटंचाईचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मनमाडकरांना याही वर्षी तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वागदर्डी धरणात केवळ २० ते २२ दिवस पाणी पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक आहे. यामुळे नगर परिषदेकडून महिन्यातून एकदाच पाणीपुरवठा केला जात आहे. गेल्या तीन दशकांपासून सव्वा लाख लोकवस्तीच्या मनमाड शहराला भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यातच यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने शहराला पाणीपुरवठा करणारे वागदर्डी धरण कोरडेठाक पडले आहे. आता पालखेड डाव्या कालव्याच्या आवर्तनावरच मनमाडकरांच्या पाण्याची भिस्त अवलंबून आहे. आवर्तन मिळाले नाही तर मनमाडकरांना भीषण पाणीबाणीचा सामना करावा लागणार आहे.

# अंबाबाई मंदिर विकासाची निघणार ४० कोटींची निविदा


## आचारसंहिता संपताच प्रक्रिया सुरु

**कोल्हापूर :** करवीर निवासिनी श्री अंबाबाई तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या ४० कोटींतून करावयाच्या कामांची निविदा आचारसंहिता संपताक्षणीच येत्या आठ-दहा दिवसांत काढण्यात येणार आहे. सध्या या निधीत करण्यात येणाऱ्या कामांचे अंदाजपत्रक करून ते तपासणीसाठी देण्यात आले आहे. ही निविदा प्रक्रिया संपेपर्यंत कोल्हापूर महापालिकेला निधी वर्ग होण्याची अपेक्षा आहे.

लोकसभेची निवडणूक १६ मार्चला जाहीर झाली. त्याआधीच्या १५ दिवसांत राज्य शासनाने वेगवेगळ्या कामांसाठी निधी मंजुरीचा धडाका लावला. त्यामध्ये कोल्हापूर महापालिकेने २०१९ साली बनवलेल्या अंबाबाई मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी ४० कोटी मंजूर केले. या निधीचा रीतसर आदेशही निघाला. परंतु, रक्कम काही मिळाली नाही. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने घाईघाईने ही रक्कम जाहीर केली खरी, पण कोल्हापूर महापालिकेच्या खात्यावर वर्ग झालेली नाही.

घोषणेची तेवढी घाई केलेल्या शासनाला निधी वर्ग करण्याचा विसर पडला की आचारसंहितेत रक्कम अडकली याबाबत प्रश्नच आहे. परंतु, महापालिकेच्या पातळीवर कामाची तयारी पूर्ण झाली आहे. ठेकेदाराला बिल देण्याची वेळ येते तेव्हा निधीचा प्रश्न उपस्थित होतो, तोपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्याचा महापालिकेचा मानस आहे. तोपर्यंत कदाचित राज्य शासनाकडून निधी देखील वर्ग होईल, अशी अपेक्षा आहे.

सरस्वती टॉकीज येथील बहुमजली पार्किंग व भक्तनिवासाचे काम निधीअभावी रखडले आहे. येथे तळमजल्यापासून ५ व्या मजल्यापर्यंत पार्किंगची व्यवस्था आहे. सर्वात वरच्या दोन मजल्यावर भक्तनिवास असणार आहे.



**४० कोटींत काय करणार**

**शासनाकडून येणाऱ्या ४० कोटींच्या निधीत सरस्वती टॉकीज येथील बहुमजली पार्किंग व भक्तनिवासाचे काम पूर्ण केले जाईल. हीच रक्कम जवळपास ३० कोटींच्या आसपास जाते. उरलेल्या १० कोटींमध्ये व्हिनस कॉर्नर येथे उभारण्यात येणाऱ्या बहुमजली इमारतीचे काम करण्यात येणार आहे.**

# डीएडसाठी ३ जूनपासून प्रवेश प्रक्रिया!

**जळगाव :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी डी.एड. प्रथम वर्षाचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार असून, दि. ३ जून २०२४ पासून उमेदवारांना अर्ज भरता येणार आहे. जिल्ह्यात गेल्या वर्षी १७ विद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेसाठी नोंदणी केली होती. त्यातील तीन विद्यालयांमध्ये प्रवेश फेरीअखेर एकही जागा रिक्त शिल्लक नव्हती. मंजूर सर्व जागांवर विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले होते

प्रवेशासाठी इच्छूक असलेले कला, वाणिज्य, विज्ञान, एमसीव्हीसी शाखेतील पात्र उमेदवार हे इयत्ता १२ वी खुल्या संवर्गात किमान ४९.५ टक्के व अन्य संवर्गात किमान ४४.५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी ऑनलाइन प्रक्रियेतील अर्ज भरणे बंधनकारक आहे. गेल्या शैक्षणिक सत्रात जळगाव जिल्ह्यात १७ अध्यापक विद्यालयांनी नोंदणी केली होती.

९०० प्रवेश क्षमता उपलब्ध होती. त्यापैकी ५३३ जागांवर प्रवेश झाले होते. नवीन सत्रासाठी विद्यालयांची नोंदणी सुरू आहे. यामध्ये गेल्या वर्षाप्रमाणे विद्यालयांची संख्या कायम राहू शकते किंवा कमी होऊ शकते. जुलैत वर्ष होणार सुरू...सध्याच्या घोषित वेळापत्रकानुसार २०२४-२५ या शैक्षणिक सत्राच्या प्रथम वर्षाची सुरुवात १५ जुलैपासून होणार आहे.या ठिकाणी भरा अर्ज...विद्यार्थ्यांनी www.maa.ac.in या संकेतस्थळावर अर्ज भरायचे आहेत. प्रवेश नियमावली, अध्यापक विद्यालयांची यादी, वेळापत्रक व प्रवेशाबाबतच्या सूचना संकेतस्थळावरील इम्पोर्टंट इन्फॉर्मेशन या टॅबमध्ये उपलब्ध असणार आहे.

# कोल्हापूर जिल्ह्यात सर्व रिक्त पदावर शिक्षक नियुक्ती

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील सर्व प्राथमिकशाळांतीलसर्व रिक्त पदांवरशिक्षकनियुक्त होणार आहेत. परिणामी वाड्या, वस्त्यांतील सर्व विद्यार्थ्यांना गुरुजी मिळणार आहेत. शासनाने नव्याने निवडलेल्या ५६३शिक्षकांनाहीरुजू होणार असल्याने रिक्त शिक्षकांच्या सर्व जागा भरणार आहेत. दरम्यान, आता सुरू असलेल्या बढती, बदलीत बुधवारी यंदाच्या शैक्षणिक वर्षात शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या एकूण ९०० जागा रिक्त राहणार आहेत. पण नव्याने येणारे शिक्षक आणि बदली, बढतीतून या रिक्त जागा भरणार आहेत. यामुळे सोयीची नाही म्हणूनशाळानको म्हटले तर कदाचित संबंधित शिक्षकास अतिरिक्त होण्याचीही वेळ येणार आहे.

जिल्ह्यांतर्गत बदलीतून राज्यातील विविध जिल्ह्यांतून २०५ शिक्षक येणार आहेत. आतापर्यंत सांगली जिल्ह्यातून १५ शिक्षक रुजू झाले आहेत. अजून सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी जिल्ह्यांतून शिक्षक येत आहेत. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्ह्यांतून बाहेरच्या जिल्ह्यात जाण्यास इच्छुक असणाऱ्या ४० शिक्षकांना येथून पदमुक्त करण्यात येणार आहे. ही सर्व प्रक्रिया संपल्यानंतर १९ जूनला नवनियुक्त ५६३ शिक्षकांना पदस्थापना मिळणार आहे. हे नवीन शिक्षक येणार असल्याने सेवानिवृत्ती, बढती, बदलीने रिक्त होणाऱ्या सर्व जागा भरणार आहेत. परिणामी दुर्गम भागातील प्राथमिक शाळांनाही शिक्षक मिळणार आहेत.

प्रत्येक वर्षी शाळा सुरू झाल्यानंतर दुर्गम भागातील पालक, शिक्षक मागणीसाठी तालुका, जिल्हा परिषद ते लोकप्रतिनिधींकडे हेलपाटे मारतात. पण यंदा शासनाने नियुक्त केलेले ५६३ शिक्षक एकावेळी मिळणार आहेत. परिणामी रिक्त जागांचा सर्व अनुशेष भरून निघणार आहे. वर्षानुवर्षे शिक्षकांसाठी आस लावून बसलेल्या वाड्या, वस्त्यांतील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांनाही गुरुजी मिळणार आहेत. यामुळे आतापासूनच काही शिक्षक सोयीच्या शाळा मिळण्यासाठी मोर्चेबांधणी करीत आहेत. यातूनच गेल्या दोन दिवसांपासून प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षक नेत्यांची वर्दळ वाढली आहे.

जिल्ह्यातील एकूण शाळा : १९६४कार्यरत शिक्षक : ६ हजारबदलीसाठी इच्छुक : ३ हजारनव्याने रुजू होणारे शिक्षक : ५६३

सर्वाधिक करवीर तालुक्यात

सध्या रिक्त असलेल्या शिक्षकांची तालुकानिहाय संख्या अशी :

करवीर : १०२, चंदगड : ७९, शाहूवाडी : ७६, राधानगरी : ७५, हातकणंगले : ६५, शिरोळ : ६५, भुदरगड : ५४, पन्हाळा : ४९, कागल : ४९, गडहिंग्लज : २६, आजरा : २५, गगनबावडा : ११.

# कोल्हापूर-राजापूर बंधाऱ्यावर सुरक्षेसाठी पोलीस तैनात - कर्नाटककडे पाण्याचा विसर्ग

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्याच्या सीमेवरील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यात कृष्णा नदीवर शेवटचा कोल्हापुरी बंधारा असणाऱ्या राजापूर बंधाऱ्यावर पाण्यासाठी चक्क पोलिस बंदोबस्त नेमण्याची वेळ आली आहे. कृष्णा नदीवरील राजापूर बंधाऱ्यातून कर्नाटकच्या हद्दीत पाणी सोडल्याची माहिती आणि व्हिडिओ बेळगाव प्रशासनाकडून व्हायरल झाल्याने गोंधळ उडाला. सांगली पाटबंधारे विभाग अलर्ट मोडवर आला असून कोल्हापूर पोलिसांशी संपर्क साधत तातडीने राजापूर बंधाऱ्यावर पोलिस बंदोबस्त तैनात केला. शेजारच्या कर्नाटक राज्यामध्ये भीषण पाणीटंचाई असल्याने आठ दिवसांपूर्वी अज्ञातांकडून राजापूर बंधाऱ्यावरील बरगे काढण्यात आले होते. त्यामुळे कर्नाटक राज्याकडे पाण्याचा विसर्ग सुरू झाला होता. कोल्हापुरात कृष्णा नदीची पाणी पातळी खालावल्याने पाण्याचा सुरक्षासाठी पोलिस बंदोबस्त देण्यात आला आहे. राजापूर बंधाऱ्यावर दोन पोलीस आणि दोन पाटबंधारे विभागाचे कर्मचारी असे चार जणांचे पथक दोन पाळींमध्ये नियुक्त करण्यात आले आहेत.

पुन्हा एकदा अज्ञातांकडून बरगे काढण्याची शक्यता असल्याने बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.राजापूर बंधारा हा कोल्हापुरातील शेवटचा कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा आहे. त्यामुळे सर्व बरगे लावून ४० फुटांवर पाणी अडवण्यात आले आहे. पाण्याचा एक थेंबही विसर्ग कर्नाटकच्या दिशेने होत नाही.

मात्र बंधाऱ्या पलीकडील बाजूस पाणी पातळी खालावली आहे. कर्नाटक राज्यामध्ये सध्या पाणीटंचाई असल्याने आठ दिवसांपूर्वी कर्नाटक हद्दीमध्ये पाणी वाहून जाण्यासाठी अज्ञात व्यक्तीने मध्यरात्री बंधाऱ्याचे बरगे काढले होते. त्यामुळे बेकायदेशीर पद्धतीने कर्नाटकच्या दिशेने पाण्याचा विसर्ग सुरू होता.चुकून जुना व्हिडिओ पाठविलायाबाबत सांगली पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता चंद्रशेखर पाटोळे यांच्याकडे विचारणा केली असता गुरुवारी राजापूर बंधाऱ्यातून पाणी सोडलेले नाही, असे त्यांनी सांगितले. त्यावर मग बेळगाव जिल्ह्यातील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा केली असता 'चुकून जुना व्हिडिओ आणि माहिती पाठवली गेली', अशी कबुली देण्यात आली. त्या व्हिडिओबाबत खातरजमा केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर काही वेळाने तो व्हिडिओ डिलीट करण्यात आला.

कर्नाटक पाटबंधारे विभागाकडून गेल्या आठवड्यातील व्हिडिओ गुरुवारी जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविण्यात आला. त्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली. तो व्हिडिओ जुना असल्याचा खुलासा नंतर संबंधित अधिकाऱ्याला करावा लागला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या व्हिडिओची खातरजमा न केल्याने संभ्रम निर्माण झाला.

# पुरंदर तालुक्यात संशयित ड्रोनच्या घिरटया

**परिसरात भितीचे वातावरण**

**पुरंदर :** दौंड तालुक्यातील वरवंड, पाटस, खोर, वढाणे बारामती तालुक्यातील मोरगाव, आंबी, कुतवळवाडी या गावांच्या पाठोपाठ आता पुरंदर तालुक्यातील रिसे, पिसे, राजुरी, पोंढे या दौंड तालुक्याच्या हद्दीजवळील गाव शिवारांमधून देखील रात्रीच्या वेळी संशयित ड्रोन फिरत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीसोबतच चोरांच्या चर्चेला उधाण आले आहे. रात्री आठ साडेआठच्या दरम्यान दिसणाऱ्या या संशयित ड्रोनचा स्थानिक युवकांकडून दुचाकीवरून पाठलाग होत असून, तालुका प्रशासनाकडे अथवा पोलिसांकडे याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या या ड्रोनचे गूढ वाढले आहे.

लग्नकार्य किंवा मोठ्या उत्सवांमध्ये सर्रास वापरल्या जाणाऱ्या ड्रोनचे सर्वांनाच आकर्षण असते. सर्वजण त्याकडे कौतुकाने पहातात. मात्र हेच ड्रोन सध्या पुरंदर दौंड तालुक्यात आता डोकेदुखी ठरले आहेत.

मागील आठवड्यात दौंड तालुक्यातील वरवंड, पाटससह अनेक गावांमध्ये तसेच बारामती तालुक्यातील मोरगाव आंबीसह अनेक गावात रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या ड्रोनमुळे येथील नागरिक भयभीत झाले असतानाच, आता तेच ड्रोन पुरंदर तालुक्यातील रिसे, पिसे, राजुरी, पोंढे या गावांसह शिवारात घिरट्या घालत असल्याने गावाकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.हे ड्रोन कोठून येतात, का येतात, रात्रीच्या वेळी कसला डाटा गोळा करतात, व कोठे गायब होतात, हेच कळत नसल्याने या संशयित ड्रोनचे गूढ वाढले आहे.

# शेतकऱ्यांना कुठं दिलासा तर कुठं फटका?

**सोलापूर :** सध्या काही भागात कांद्याच्या दरात घसरण झालीय, तर काही भागात कांद्याचे दर वाढले आहेत. त्यामुळं कुठं कांदा उत्पादकांना दिलासा मिळतोय तर कुठं फटका बसत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर बाजार समिती त कांद्याच्या दरात घसरण झाल्याचं चित्र पाहायला मिळालं, तर कोल्हापूर बाजार समितीत कांद्याच्या दरात वाढ झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापूरच्या बाजारपेठेत कांद्याचा भाव ३० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचला आहे. निर्यातबंदी संपल्यानंतर महाराष्ट्रातील कोणत्याही बाजारपेठेतील कांद्याचा हा सर्वाधिक भाव आहे. कोल्हापुरात ४२९० क्विंटल आवक होऊनही किमान भाव ७०० रुपये, कमाल ३००० रुपये आणि सरासरी भाव १७०० रुपये प्रतिक्विंटल राहिला. दुसरीकडे, मंगळवेढा येथेही कांद्याचा कमाल भाव ३००० रुपये प्रतिक्विंटलवर पोहोचला आहे. मात्र, धुळे, सोलापूर, जालना आणि बारामतीचा समावेश असलेल्या अनेक मंडईंमध्ये किमान भाव केवळ १०० ते ३०० रुपये प्रति क्विंटल आहे.

राज्यातील बहुतांश मंडईंमध्ये कांद्याची आवक कमी

महाराष्ट्र कृषी पणन मंडळानं दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील बहुतांश मंडईंमध्ये कांद्याची आवक कमी होती. निर्यातबंदी संपल्यानंतरही भावात फारसा फरक नसल्याने अनेक शेतकरी आता कांद्याची साठवणूक करत आहेत. खरीप हंगामातील कांदा साठवून ठेवता येत नसल्याने शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने विकावे लागले. खरिपाचा कांदा लवकर सडू लागतो. तर रब्बी हंगामातील कांदा तातडीने विकण्याची सक्ती नाही. हा कांदा ऑक्टोबरपर्यंत साठवता येतो, त्यामुळे शेतकरी आता तो विकण्याऐवजी साठवून ठेवत आहेत.

बुधवारी महाराष्ट्रातील केवळ तीन मंडयांमध्ये दहा हजार क्विंटलपेक्षा जास्त कांद्याची आवक झाली होती. पिंपळगाव-बसवंत येथे सर्वाधिक २०००० क्विंटल कांद्याची विक्री झाली. अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा मंडईत १८६६२ क्विंटल कांद्याची आवक झाली. तिसऱ्या क्रमांकावर लासलगाव-विंचूर मंडई होती, जिथे ११७०० क्विंटल आवक झाली. याशिवाय इतर बाजारपेठेत कांद्याची फारच कमी विक्री झाली. भुसावळमध्ये केवळ ३० क्विंटल, पुणे-पिंपरीमध्ये १३, मंगळवेढा येथे ८२ आणि कामठीमध्ये केवळ ३४ क्विंटल कांद्याची आवक झाली.

**कोणत्या बाजारात कांद्याला किती दर?**

**जालना मंडईत किमान भाव १५० रुपये, कमाल १३०० रुपये आणि सरासरी ८०० रुपये प्रतिक्विंटल**



**जुन्नरमध्ये किमान भाव फक्त ३०० रुपये, कमाल २६०० रुपये आणि सरासरी १२०० रुपये प्रतिक्विंटल**

**धुळ्यात किमान भाव केवळ १०० रुपये प्रतिक्विंटल होता. कमाल भाव केवळ १०० रुपये आणि सरासरी भाव १६०० रुपये**

**लासलगाव किमान भाव फक्त ५०० रुपये, कमाल १७०१ रुपये आणि सरासरी १३८० रुपये प्रतिक्विंटल**

# अजितदादांनी नाव घेतल्यानंतर हिरामण खोसकर भुजबळांच्या भेटीला

**नाशिक :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी इगतपुरीचे काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर यांचा उल्लेख करून ते राष्ट्रवादीच्या संपर्कात असल्याचे वक्तव्य केले होते. यामुळे राजकीय चर्चांना उधाण आलेले असतानाच आमदार हिरामण खोसकर हे मंत्री छगन भुजबळ (उहहरसरप इर्हीक्षलरश्र) यांच्या भेटीला भुजबळ फार्म येथे दाखल झाले आहेत. त्यामुळे ते आता महायुतीत प्रवेश करणार का? याची चर्चा रंगत आहे.

हिरामण खोसकर हे महायुतीत येणार अशा चर्चा मागील काळापासून रंगल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात भाषणादरम्यान अजित पवारांनी खोसकरांचे नाव घेतले होते. आता हिरामण खोसकर आणि छगन भुजबळ यांच्या भेटीत नेमकी काय चर्चा होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



तुम्ही महायुतीत जाणार का? अशी विचारणा हिरामण खोसकर यांना केली असता त्यांनी या प्रश्नावर मिश्किल टिप्पणी केली आहे. २० पैकी १९ जण महायुतीत आहेत. पण मी एकटाच महाविकास आघाडीत आहे, असे त्यांनी म्हटले. छगन भुजबळ हे मंत्री असल्याने त्यांनी भेट घेतल्याची प्रतिक्रिया हिरामण खोसकर यांनी दिली आहे. आता ते खरंच महायुतीत प्रवेश करणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**अजितदादांकडून हिरामण खोसकरांच्या नावाचा उल्लेख**

दरम्यान, नुकतीच लोकसभेची निवडणूक पार पडली आहे. या निवडणुकीत नाशिकच्या राजकारणाची चर्चा संपूर्ण राज्यभरात झाली.

लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीची चर्चा रंगू लागली आहे. त्यातच इगतपुरी-त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिरामण खोसकर यांची भूमिका नक्की कुठल्या पक्षाकडे यावरून वादाची ठिणगी पडताना दिसत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खोसकर यांच्या नावाचा उल्लेख केला. नाशिक लोकसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला हवी होती, तसे नियोजन देखील झाले होते. आपले आमदार माणिकराव कोकाटे, सरोज अहिरे यांचे नाव घेताना हिरामण खोसकर यांचाही उल्लेख राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून अजित पवारांनी केला. यामुळे हिरामण खोसकर यांचे नाव चर्चेत आले आहे.

# धक्कादायक! गटारात स्त्री जातीचं अर्भक सापडलं; साताऱ्यातील घटनेनं खळबळ

**उंब्रज :** येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या एका गटारात स्त्री जातीचे अर्भक मृतावस्थेत सापडले. त्यामुळे गावात एकच खळबळ उडाली. या अमानवी कृत्यामुळे उंब्रजमध्ये संतापाची लाट पसरली. दरम्यान, घटनेची तीव्रता पाहून काही ग्रामस्थांनी उंब्रज पोलीस ठाण्यात धाव घेतली. मात्र उंब्रज पोलीस ठाण्यात असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी याची दखल एक तासाने घेऊन घटनास्थळी जाण्यात धन्यता मांडली.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी,गुरुवारी दिनांक ३० रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास येथील रस्त्यावरमुले क्रिकेट खेळत होती. खेळताना मुलांचा बॉल गटारात गेला. तेव्हा त्या मुलांना हे स्त्री जातीचे अभ्रक मृत अवस्थेत दिसून आले. यानंतर परिसरात मुलांनी ही घटना सांगितली. लगेचचसर्वत्र ही खळबळजनक माहितीपसरली.यानंतर काही ग्रामस्थांनी उंब्रज पोलीस ठाण्यात धाव घेतली. मात्र तेथील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रमेश ठाणेकर व कर्मचारी यांनी एक तासाने या घटनेची दखल घेऊन घटनास्थळी भेट दिली. यानंतर पोलिसांनी पंचनामा करुन अर्भक ताब्यात घेवून शवविच्छेदनासाठी कराड येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवले आहे. अहवालानंतर सदर अर्भकाविषयी अधिकची माहिती स्पष्ट होणार असल्याचे पोलीसांनी सांगितले.गटारात मिळालेले अर्भक स्त्री जातीचे असून पूर्ण वाढ झालेले आहे. गेल्या दोन तीन दिवसांपासून ते गटारात असल्याचा कयास असून त्याची दुर्गंधी ही परिसरात पसरली होती.

उंब्रजमध्ये संतापाची लाट

स्त्री जातीचे नवजात अर्भक गटारात सापडल्याने एकच खळबळ उंब्रजमध्ये माजली. या अमानवी कृत्याबाबत व उंब्रज पोलिसांनी दाखवलेल्या दिरंगाईबाबत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. या असून घटनेची माहिती मिळताच ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांनी घटनास्थळी गर्दी केली होती.

# दौंड शुगरचे ऊस लागवड धोरण जाहीर

**देऊळगावराजे :** आलेगाव (ता. दौंड) येथील दौंड शुगर कारखान्याचे सन २०२४-२५ ऊस लागवड धोरण जाहीर झाले असल्याची माहीती कारखान्याचे संचालक वीरधवल जगदाळे यांनी दिली शेतकऱ्यांनी यांनी यावर्षी आडसाली उसाची लागवड १ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२३ पर्यत करावी यामध्ये उसाच्या जाती को- ८६०३२ ,कोएम-२६५,फुले १५०२२ या ऊसाच्या जाती लावाव्यात.

त्यानंतर १सप्टेंबर ते ३० सप्टेंबर को ८६०३२, कोएम २६५,व्हिएसआय ८००५, कोसी६७१, फुलेऊस१५०१२, कोव्हिएसआय १८१२१, या ऊस जाती लावाव्यात.

पुर्व हंगाममध्ये १ आक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यत को ८६०३२,कोएम २६५,फुले ऊस १५०१२,कोव्हिएस आय १८१२१ ,कोसी-६७१,व्हिएसआय-४३४ एमएस-१००१,व्हिएसआय -८००५ या ऊसाच्या जाती चा समावेश करण्यात आला आहे

सुरु ऊसाची लागवड १ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी २०२४ या कालावधीमध्ये करावी यामध्ये उसाच्या जाती -८६०३२,,२६५,कोसी-६७१,व्हिएसआय-४३४, कोएम २६५,को९०५७,फुले ऊस १५०१२ ,कोव्हिएसआय १८१२१ ,एमएस-१००१,व्हिएस आय ८००५

खोडवा मध्ये २८ फेब्रुवारी २०२५ अखेर तुटलेला ऊसाचा खोडवा यामध्ये वरील सर्व ऊस जातीचा राहील.

शेतकऱ्यांना उसाच्या उत्पादन वाढवण्यासाठी कारखान्यामार्फत शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवण्यात येत असुन त्या योजनाचा लाथ शेतकऱ्यांनी घ्यावा यामध्ये ठिबक सिंचन, ऊस रोपे पुरवठा, सबसॉयलरची उपलब्धता ,आंतर मशागतीसाठी लहान ट्रक्टरचे वाटप, शेतकरी सहली, हिरवळीचे खते ,बायोकंपोस्ट खत, माती,पाणी परिक्षण, रासायनिक खते, जैविक खते, औषधे इ योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घेण्याच घ्यावा असे कारखान्याच्या वतीने शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले .

# जवखेडच्या संत्रे कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी विधानसभेत आवाज उठविणार : वडेट्टीवार




**मुंबई :** संत्रे कुटुंबाला केलेली मारहाण म्हणजे सत्तेचा माज आहे. गरीब कुटुंब आहे म्हणून त्रास देता पण या संत्रे कुटुंबाला न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू विधान सभेत आवाज उठवू, असा इशारा विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिला. जवखेडा गावात, केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे आणि आमदार संतोष दानवे यांच्या कार्यकर्त्यांनी मारहाण करून घर उध्वस्त केल्याचा गंभीर आरोप संत्रे कुटुंबियानी केला आहे. त्याची चौकशी ची मागणी वडेट्टीवार यांनी केली

वडेट्टीवार म्हणाले की, जवखेडा गावातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३, एम.साठी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे आणि आमदार संतोष दानवे यांच्या कार्यकर्त्यांनी कुंभार समाजाच्या संत्रे कुटुंबाला मारहाण केली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून नियमबाह्य पद्धतीने घर उध्वस्थ केले असा आरोप पीडित संत्रे कुटूंबानी केला आहे. अज्ञात आठ ते दहा जणांनानी रात्रीच्या सुमारास घरात घुसून मारहाण करत घर उद्धस्त केल्याची घटना केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या गावात घडली आहे.

जवखेडा गावातील कुंभार समाजाच्या संत्रे कुटुंबियांनी सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल करून न्याय मिळावा मागणी केली आहे. या प्रकारणी हसनाबाद पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे .या तक्रारीच्या आधारे हसनाबाद पोलिसांनी आज्ञात आठ ते दहाजणा विरुद्ध संत्रे कुटूंबियांना मारहाण करून त्यांचं घर उध्वस्त केल्या प्रकरणी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे.

परंतु हा तपास समाधानकारक नाही. या कुटुंबाला काही झालं तर रावसाहेब दानवे आणि त्यांचे कुटुंब याला जबाबदार ठरेल. संत्रे कुटुंबाने दानवे यांचे नाव घेतले आहे. त्यांच्यावर गुन्हा दखल करून चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.



आत्महत्या ग्रस्त शेतकरी विठ्ठल दाभाडे यांची चिठ्ठी जोडली आहे.

# रेल्वेच्या ६३ तासाच्या मेगाब्लॉकला विरोध, सुट्टी किंवा वर्क फ्रॉम होम जाहीर करा

**मुंबई :** मुंबई आणि ठाणे स्थानकातील प्लॅटफॉर्मच्या रुंदीकरणाच्या कामांसाठी मध्य रेल्वेने ३०/३१ मे च्या मध्यरात्रीपासून ते २ जून पर्यंत ६३ तासांचा विशेष ब्लॉक जाहीर केला आहे. या मेगा

या ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या उपनगरीय मार्गावरील ९३० लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहे. याचा फटका या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या तब्बल ३३ लाख प्रवाशांना त्रास सहन करावा लागणार आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मेगा ब्लॉक रद्द करण्यात यावा अन्यथा सुट्टी किंवा वर्क फ्रॉम होम जाहीर करा अशी मागणी होत आहे.

ठाणे स्थानकातील प्लॅटफॉर्मच्या रुंदीकरणाच्या कामांसाठी मध्य रेल्वेने ३०/३१ मे च्या मध्यरात्रीपासून ते २ जून पर्यंत ६३ तासांचा विशेष ब्लॉक जाहीर केला आहे. तसेच सीएसएमटी रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म विस्तारीकरणासाठी ३०/३१ मे च्या मध्यरात्री ते २ जूनच्या दुपारपर्यंत ३६ तासांचा ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या उपनगरीय मार्गावरील ९३० लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहे. याचा फटका या मार्गावरून दररोज प्रवास करणाऱ्या तब्बल ३३ लाख प्रवाशांना त्रास सहन करावा लागणार आहे.

मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना एक आठवडा पूर्वसूचना देणे अपेक्षित होते. मात्र, ब्लॉक सुरू होण्याच्या एक दिवस अगोदर ब्लॉकची घोषणा केल्याने प्रवासी संतप्त झाले आहेत. मेगा ब्लॉक रद्द करण्यात यावा या मागणीसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे जोरदार घोषणाबाजी करत तीव्र आंदोलन केले. तर, रेल्वेच्या ब्लॉकमुळे शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये व खासगी कंपन्यातील नोकरदार वर्गाला 'सुट्टी' किंवा 'वर्क फ्रॉम होम' जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना प्रवक्त्या ड. सुशीबेन शाह यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. त्यामुळे, आता मध्य रेल्वेच्या मेगा ब्लॉकवर नेमका काय निर्णय होतो, हे पाहावे लागेल.

मध्य रेल्वेच्या मनमानी कारभाराविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मुंबई अध्यक्ष ऍड.अमोल मातेले यांच्या नेतृत्वात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे घोषणाबाजी करत जोरदार आंदोलन करत मेगाब्लॉक मागे घेण्याची मागणी केली. मेगाब्लॉक घेण्यापूर्वी किमान ७ दिवस अगोदर रेल्वे प्रवाशांना सूचना देण्यात यावी, बेस्ट, एसटी बसची पर्यायी व्यवस्था करावी, मासिक पास धारक आणि मेल गाड्यांचे पूर्व बुकिंग असलेल्या प्रवाशांसाठी मोफत व्यवस्था करावी, अशा विविध मागण्या युवक काँग्रेसने मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांच्याकडे केल्या.

मध्य रेल्वेच्या या ब्लॉकमुळे शेकडो रेल्वेगाड्या रद्द आणि शॉर्ट टर्मिनेट झाल्या आहेत. सीएसएमटीपर्यंत येणाऱ्या अनेक रेल्वेगाड्या दादर, ठाणे, पनवेल, नाशिक व पुण्यापर्यंत चालवण्यात येतील. याशिवाय, सीएसएमटीवरून सुटणाऱ्या अनेक रेल्वेगाड्या दादर, पनवेल, नाशिक स्थानकातून सुटतील. नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, ठाणे या भागातील अनेक प्रवाशी नोकरीनिमित्त प्रवास करतात. परंतु, मध्य रेल्वेच्या जम्बो ब्लॉकमुळे प्रवासी लोकलमधून प्रवास कसा करणार हा प्रश्न उपस्थित होतोय. त्यामुळे, नोकरदार वर्गाला सुट्टी किंवा वर्क फ्रॉम होम जाहीर करावा, अशी मागणी ड. सुशीबेन शाह यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

# सातारा नगरपालिकेच्यावतीने तीस हजार वृक्ष लागवडीची मोहीम



सातारा शहर परिसरात वृक्ष लागवडीसाठी भर उन्हात खड्डे तयार करताना कर्मचारी (छाया- अजित जगताप, सातारा)

**सातारा :** सातारा नगरपालिकेच्या वतीने हरितक्रांती घडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू झालेले आहेत. त्याचाच भाग म्हणून जूनच्या दुसऱ्या आठवड्यात सातारा शहरालगत तीस हजार विविध जातीच्या वृक्षाचे लागवड करण्याची मोहीम हाती घेतली आहे.

सातारा नगरपालिकेचे मुख्यधिकारी अभिजीत बापट व विविध खात्याचे प्रमुख तथा कर्मचारी यांच्या सहकार्याने भैरोबाचा डोंगर या ठिकाणी पंधरा हजार व इतर ठिकाणी मोकळ्या जागेत पंधरा हजार असे मिळून तीस हजार वृक्षारोपण करण्यात येणार आहे. सध्या खड्डे काढण्याचे काम वेगाने सुरू आहे. भर उन्हाळ्यात आतापर्यंत बाराशे ते तेराशे खड्डे खणून झालेले आहेत.

येत्या आठ दिवसात उर्वरित खड्डे खोदून जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पावसाच्या आगमनासोबतच या वृक्षाची लागवड करण्यात येणार आहे. यामध्ये भावा पाच पेट, आपटा फोनचाफा ,पिवळा चाफा, मिचेलियाचा पाक, कांचन, बॉटल ब्रश, पारिजात, कैलास पत्ती, बेल, बकुळा, बूत ,कदम, बुडखेरी, चिंच, गोरख चिंच, आवळा, जांभूळ, विलायती चिंच, बोर, बोकर, कडूलिंब, महागुनी, अर्जुन, तोबाई ,पिंपळ, आंबा, फणस, नारळ, निम, कुसुम, रानभेंडी, त्याचबरोबर इतर गुणकारी व औषधी तसेच फळ देणाऱ्या रोपांची लागवड केली जाणार आहे. याचबरोबर या रोपांची निगा राखण्याची जबाबदारी सातारा नगरपालिका पार पाडणार आहे.

# राज्यात १० हजार उद्योगांना मिळणार ४०० मेगाव्हॅट सोलर ऊर्जा मोफत



**नागपूर :** राज्य सरकारच्या प्रस्तावित मुख्यमंत्री सौर उद्योग उत्थान योजनेत (एमएसयू२वाय) राज्यातील १० हजार सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) प्रत्येकी ४०० मेगाव्हॅट सोलरवीजमोफत मिळणार आहे. योजनेची अंमलबजावणी राज्यात लवकरच होणार आहे.

या योजनेमुळे उद्योगांची विजेच्या खर्चावर ३० ते ४० टक्के बचत होईल, शिवाय विजेचा दर्जाही उच्च राहील. महाराष्ट्रात सुमारे दहा हजार उद्योगांच्या छतावर प्रत्येकी ४०० मेगाव्हॅट सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याचे योजनेचे उद्दिष्ट आहे. योजनेत उद्योजकांना काहीही खर्च येणार नाही. महिन्याला ४०० मेगाव्हॅटपेक्षा जास्त विजेचा उपयोग झाल्यास उद्योगाला प्रति युनिट ५ रुपये दरानेवीजबिलचुकते करावे लागेल. याअंतर्गत उद्योजकांना फॉर्म भरून द्यायचा आहे. ही प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याची माहिती आहे.

हिंगणा एमआयए इंडस्ट्रीज असोसिएशनने (एमआयए) नागपूरविभागातील उद्योजकांनी वीज बचत आणि वीज बिल कमी करण्यावर लक्ष केंद्रित करून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. याकरिता एमआयएने महात्मा फुले रिन्युएबल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजीच्या (महाप्रीत) सहकार्याने हिंगणा येथील असोसिएशनच्या सभागृहात चर्चासत्राचे आयोजन केले. महाप्रीतचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी धनाजी काळे यांनी उद्योजकांना योजनेची माहिती दिली.

मंचावर एमआयएचे अध्यक्ष कॅ. सी.एम. रणधीर, कोषाध्यक्ष अरूण लांजेवार उपस्थित होते.

धनाजी काळे म्हणाले, सौर ऊर्जेचा वापर आणि विजेच्या बिलात लक्षणीय बचत करू इच्छिणाऱ्या उद्योजकांसाठी योजना फायदेशीर आहे नागपुरातील जास्तीत जास्त उद्योजकांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

अरूण लांजेवार यांनी आभार मानले. या प्रसंगी महाप्रीतचे प्रकल्प व्यवस्थापक यशराज गोरे, शुभम चौधरी, मनोज शिरवळकर, स्वाती झा, एमआयएचे सहसचिव अनंत गुप्ता, सचिन जैन, एस.एम. पटवर्धन, मनीष सावळ, राजकुमार चोखानी, राकेश गुप्ता, कुणाल इटनकर, संदीप फडसे, रमेश पटेल आणि इतर एमआयए सदस्य उपस्थित होते.

# सातारा जिल्ह्यातील धरणांनी गाठला तळ; नेमका पाणीसाठा किती

**सातारा :** जिल्ह्यात दुष्काळाची भीषणता असून, सिंचनासाठी पाण्याची मागणी वाढत असल्याने धरणे रिकामी होऊ लागली आहेत. त्यामुळे अनेक धरणांनी तळ गाठला आहे. उरमोडी धरणात अवघा साडेसात, तर कण्हेरमध्ये १७ टक्के साठा राहिला आहे. कोयना धरणात१९ टीएमसीपाणीशिल्लक आहे. सध्या सर्वांचेच डोळे मान्सूनकडे आहेत.

जिल्ह्यातील शेती मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. जून ते सप्टेंबर महिन्यादरम्यान पर्जन्यमान होते. यावरच जिल्ह्यातील कृषिक्षेत्राची मदार असते. मात्र, गेल्यावर्षी जिल्ह्यातच अपुरा पाऊस झाला. सुमारे ३० टक्के पावसाची तूट होती. त्यामुळे सर्वच तालुक्यांत कमी - अधिक फरकाने परिणाम झाला. त्यातच जिल्ह्यात प्रमुख ६ धरणे आहेत. या धरणांचीपाणीसाठवणक्षमता १४८ टीएमसीपेक्षा अधिक आहे. यातील बहुतांश धरणे ही भरली नाहीत.

महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी समजल्या जाणाऱ्याकोयना धरणाचीक्षमता १०५.२५ टीएमसी आहे. या धरणातही ९५ टीएमसीपर्यंतच साठा पोहोचलेला. तशीच स्थिती कण्हेर आणि उरमोडी या धरणाची होती. जिल्ह्यातील या धरणांचेच पाणी पिण्यासाठी आणि सिंचनासाठी जाते. त्यामुळे ही धरणे कृषिक्षेत्राला आधार देणारी ठरतात. पण, गेल्यावर्षी धरणेच न भरल्याने सिंचनासाठी सतत मागणी वाढत गेली. परिणामी गेल्यावर्षी नोव्हेंबरपासून मागणीप्रमाणे सिंचनासाठी पाणी सोडले जात आहे.



जिल्ह्यातील कोयना धरणातील पाण्यावर वीजनिर्मिती होते. यासाठी पाण्याची तरतूद आहे. तसेच धरणातील पाण्यावर टेंभू, ताकारी आणि म्हैसाळ या प्रमुख तीन पाणी योजना आहेत. या धरणातील पाणी अधिक करून सांगली जिल्ह्यासाठी जाते. तसेच सोलापूर जिल्ह्यातील योजनेसाठीही कोयनेचे पाणी सोडण्यात येते. सांगली जिल्ह्यातील सिंचनासाठी आजही पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. सध्या २१०० क्यूसेकने सांगलीसाठी पाणी सोडले जात आहे. याच धरणात आता १८.२२ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. १९.१९ टीएमसी पाणी शिल्लक आहे.

उरमोडी धरणावर सातारा आणि माण, खटाव हे दुष्काळी तालुके अवलंबून आहेत. गेल्यावर्षी उरमोडी धरण भरले नव्हते. पण, सिंचनासाठी पाण्याची मागणी होत होती. त्यामुळे पाणी सोडण्यात आले. आज धरणात अवघा ७.५७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. म्हणजेच धरणात पाऊण टीएमसी पाणी आहे. तशीच स्थिती कण्हेर धरणाची आहे. या धरणात १.७४ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. टक्केवारीत हे प्रमाण १७.२२ आहे, तर कण्हेरमधूनही सिंचनासाठी पाण्याचा विसर्ग सुरू आहे. वाई तालुक्यात धोम धरण असून, यामध्ये ४.७४ टीएमसी पाणीसाठा आहे. तरीही सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे. तारळी धरणातूनही पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

**जिल्ह्यातील धरणांची स्थिती (टीएमसीमध्ये)**

**धरण - सध्याचा साठा - टक्केवारी - एकूण पाणीसाठा**

**कोयना** - १९.१९ - १८.२२ - १०५.२५

**धोम** - ४.७४ - ३५.१३ - १३.५०

**बलकवडी** - ०.१३ - ३.१४ - ४.०८

**कण्हेर** - १.७४ - १७.२२ - १०.१०

**उरमोडी** - ०.७५ - ७.५७ - ९.९६

**तारळी** - १.४८ - २५.३२ - ५.८५

मागील वर्षी कण्हेर, तारळी अन् उरमोडीत अधिक साठा शिल्लकजिल्ह्यातील सर्वच धरणांतील पाणी सिंचनासाठी सोडण्यात येते. त्यामुळे पावसाळ्यानंतर या धरणातील पाणी तरतुदीनुसार सोडले जाते. जिल्ह्यात दुष्काळी स्थिती असल्याने पाण्याची मागणी वाढली. त्यामुळे धरणे रिकामी होऊ लागली आहेत. गतवर्षी काही धरणांत जादा पाणीसाठा होता. गेल्यावर्षी ३० मेपर्यंत कण्हेरमध्ये २.४१ टीएमसी पाणी होते,, तर उरमोडीत ४.१५ आणि तारळी ३.१९ टीएमसी पाणीसाठा शिल्लक होता. कारण, २०२२ मध्ये चांगला पाऊस झाला होता. त्यामुळे धरणातील पाण्याला मागणी कमी होती. त्याचबरोबर कोयना धरणात गेल्यावर्षी १९.७२ टीएमसी साठा होता. सध्या धरणात १९.१९ टीएमसी पाणी आहे.